# राज्यसेवा / सरळसेवा / आरोग्य विभाग

स्पर्धा परीक्षा

# चालू घडामोडी

( Special - Group B & C )

## मार्च - २०२५ ( मासिक )

## महत्वाचे मुद्दे

- ज्ञानपीठ पुरस्कार
- विधेयक
- महत्वाच्या नियुक्त्या
- ऑस्कर पुरस्कार
- योजना सारांश
- महत्वाचे वन लाईनर
- महाराष्ट्र भूषण
- खेळ



















स्पर्धा परिक्षा

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

संचालक - सुरेश नारायण कुंभार

@mpscshorts +917720039454 www.mpscshort.in





# चालू घडामोडी – मार्च ( मासिक )

- प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य अव्वल ठरले आहे.
- प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत महाराष्ट्रात सर्वात जास्त प्रकल्प छत्रपती संभाजी नगर जिल्हयात मंजूर झाले आहेत.
- शिक्षा संजीवनी विमा योजना राजस्थान राज्याने लाँच केली आहे.
- हेरथ उत्सव काश्मिरी पंडित समुदायातर्फे साजरा करण्यात येतो.





- नुकतेच UAE देशाने Blue Visa जारी केला आहे.
- सैन्य अभ्यास जल-थल- रक्षा २०२५ चे आयोजन गुजरात राज्यात करण्यात आले आहे.
- SABA महिला बास्केटबॉल चॅम्पियनशिप 2025 भारत देशाने जिंकली आहे.
- मैत्री अँप बंदरे आणि जलमार्ग मंत्रालयाने लॉन्च केले आहे.
- नुकतेच हरियाणा राज्य सरकारने साक्षीदारांच्या संरक्षणासाठी 'साक्षीदार संरक्षण योजना सुरू केली आहे.
- हायड्रोजन वाहतूक पाईप विकसित करणारी देशातील पहिली कंपनी टाटा स्टील बनली आहे.
- International redio biology conference चे आयोजन नवी दिल्ली येथे करण्यात आले आहे.
- चंद्रावरील पाण्याचा शोध घेण्यासाठी नासाने "लूनर ट्रेलब्लेझर" उपग्रह लॉच केला आहे.

★ 97 व्या ऑस्कर पुरस्कार 2025 मध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट पुरस्कार अनोरा चित्रपटाला मिळाला आहे.
★ 97 व्या ऑस्कर पुरस्कार 2025 मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार एड्रियन ब्रॉडी यांना मिळाला  आहे.
★ 97 व्या ऑस्कर पुरस्कार 2025 मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिकी मॅडिसन यांना मिळाला आहे.



- भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेश जागतिक बुद्धिबळ महासंघाने जाहीर केलेल्या क्रमवारीत तिसऱ्या
- स्थानावर झेप घेतली आहे.
- अमेरिकेतील नासा च्या यंत्रणांचा वापर करून ब्ल्यू घोस्ट खाजगी अवकाशयानाने चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वी अवतरण केले आहे.
- फायरफ्लाय एअरोस्पेस हि कंपनी चंद्रावर यानाचे अवतरण करणारी पहिली खाजगी कंपनी ठरली आहे.
- मोबाईल वर्ल्ड काँग्रेस २०२५ परिषद स्पेन या देशात होणार आहे.





- तल्लीकी वंदनम योजना आंध्र प्रदेश राज्याने लाँच केली आहे.
  थल्लीकी वंदनम योजना आंध्र प्रदेश सरकारने सुरू केलेली एक योजना आहे जी सरकारी शाळेत शिकणाऱ्या गरीब कुटुंबातील मुलांच्या शिक्षेसाठी वित्तीय मदत पुरवते.

- **उद्दिष्ट:** या योजनेचा मुख्य उद्दिष्ट सरकारी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक सहाय्य देणे आहे, ज्यामुळे ते आपल्या मुलांच्या शिक्षणाचे खर्च, जसे की शालेय फी, पुस्तके आणि इतर साहित्य यासाठी मदत घेऊ शकतील.
- **वित्तीय मदत:** या योजनेअंतर्गत, पालकांना प्रत्येक वर्षी 15,000 रुपये वित्तीय सहाय्य मिळते.

- कविश्रेष्ठ कुसुमाग्रजत स्मृती पुरस्कार डॉ. अरुणा ढेरे जाहीर झाला आहे.
- Bar council of India च्या अध्यक्ष पदी मनन कुमार मिश्रा यांची नियुक्ती झाली आहे.
- भारतातील महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय मंत्रालयाने स्वावलंबिनी उपक्रम सुरू केला आहे.
- देशातील पहिली रोबोटिक सर्जरी नागपूर या ठिकाणी करण्यात आली.
- फोर्ब्स इंडिया लीडरशिप अवार्ड २०२५ द्वारा आयकॉन ऑफ एक्सलन्स अवॉर्ड जय शहा यांना देण्यात आला आहे.
- जगातील सर्वात महागडे चलन कुवैती दिनार या देशाचे ठरले आहे ( एका कुवैती दिनारचे भारतीय रुपयात मूल्य अंदाजे 274 रू रुपये इतके आहे )
- राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाची ७ वी बैठक गुजरात राज्यात आयोजित करण्यात आली आहे.
- सध्या चर्चेत असलेले तंगानिका सरोवर आफ्रिका खंडात आहे.
- दुसरी आशियाई योगासन स्पर्धा नवी दिल्ली येथे होणार आहे.
- उत्तराखंड राज्याने मुख्यमंत्री एकल महिला स्वरोजगार योजना लाँच केली आहे.
- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 2 एप्रिल पासून भारतावर आयात शुल्क लागू करण्याची घोषणा केली आहे.
- ऑस्ट्रेलिया देशाचा क्रिकेटपटू स्टीव्ह स्मिथ ने एकदिवशीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे.
- शरथ कमल याने टेबल टेनिस खेळातून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे.



- भारताच्या विधी सचिव पदी अंजू राठी-राणा यांची नियुक्ती झाली आहे.
- पी. इनियान भारतीय ग्रँड मास्टर ने Canns international Open chess tournament जिंकली आहे.
- भारतातील पहिल्या विश्व शांती केंद्राचे उद्घाटन गुरुग्राम येथे करण्यात आले आहे.



- पुलीत्झर पुरस्कार २०२५ लियू जियाकून प्रदान करण्यात आला आहे.
- आंतरराष्ट्रीय पातळीवरचा माता रमाई आंबेडकर पुरस्कार सीमा पाटील यांना जाहीर झाला आहे.


- जागतिक दहशतवाद निर्देशांक २०२५ मध्ये बुर्किना फासो देश प्रथम क्रमांकावर आहे.
- जागतिक दहशतवाद निर्देशांक २०२५ मध्ये भारत 14 व्या स्थानावर आहे.

- देशात महिला स्टार्टअप मध्ये महाराष्ट्र राज्य प्रथम स्थानावर आहे .
- इंडोर शॉट पी मध्ये १६ मीटर पार करणारी पहिली भारतीय महिला कृष्णा जयशंकर ठरली आहे .
- महाराष्ट्र राज्याने छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र असलेल्या रुपे कार्ड चे अनावरण केले आहे .

- ICC चॅम्पियनशिप 2025 चे विजेतेपद भारत देशाने पटकावले आहे .
- ICC चॅम्पियनशिप 2025 चा उपविजेता देश न्यूझीलंड .
- ICC चॅम्पियनशिप स्पर्धेत मालिकावीराचा पुरस्कार रचिन रविंद्र यांना मिळा ला आहे .
- C चॅम्पियन्स ट्रॉफी सर्वाधिक 3 वेळा पटकावणारा देश भारत ठरला आहे .




- विराट कोहली हा ५५० आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा दुसरा भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे .
- आशियाई महिला अजिंक्यपद कब्बडी स्पर्धेचे विजेतेपद भारत देशाने पटकावले आहे .
- आशियाई महिला अजिंक्यपद कब्बडी स्पर्धा इराण येथे आयोजित करण्यात आली होती .
- बॅरिस्टर शेषेराव वानखेडे यांच्यानंतर अजित पवार यांनी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सर्वाधिक वेळा सादर करण्याचा विक्रम केला आहे .
- कॅनडा च्या पंतप्रधान पदी मार्क कार्नी यांची नियुक्ती झाली आहे .
- अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून 3 ऑक्टोबर हा दिवस करण्यात येणार आहे .
- सर्वात प्रदूषित देशांमध्ये जगात भारताचा 5 वा क्रमांक आहे .
- जगात सर्वात प्रदूषित देशांमध्ये चाड देश प्रथम क्रमांकावर आहे .



- जगातील सर्व देशांच्या राजधान्यांमध्ये सर्वात प्रदूषित राजधानी दिल्ली ठरली आहे .
- भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नुकतेच मॉरिशस देशाचा सर्वोच्च सन्मान जाहीर झाला आहे .
- सिप्री अहवालानुसार भारत रशिया या देशाकडून सर्वाधिक शस्त्रे आयात करतो .
- रामसर अवॉर्ड २०२५ प्राप्त करणारी पहिली भारतीय महिला जयश्री व्यंकटेशन ठरली आहे .
- पोलीस अधिकारी कृष्ण प्रकाश यांच्या 'ट्रस्टवर्दी' काव्यसंग्रहाला हिंदी साहित्य अकादमीकडून सुवर्णपदक देउन सन्मानित करण्यात आले .



- नुकतेच तामिळनाडू राज्य सरकारने रुपयाचे चिन्ह बदलून तमिळ अक्षर वापरण्याचा निर्णय घेतला आहे .
- महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने पानिपत या ठिकाणी मराठा शौर्य स्मारक उभारण्यात येणार आहे .
- भारतात पहिल्यांदा नवी दिल्ली येथे वर्ल्ड पॅरा ग्रँड प्रिक्स चे आयोजन करण्यात आले आहे .
- नुकतेच मुख्यमंत्री बालिका समृद्धी योजना आणि मुख्यमंत्री कन्या आत्मनिर्भर योजना त्रिपुरा राज्यात लाँच करण्यात आल्या आहेत .
- जम्मू आणि काश्मीर सरकारने ने बांगस घाटी क्षेत्र इको टुरिझम हब म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे .
- माधव राष्ट्रीय उद्यान देशातील 58 वे व्याघ्र प्रकल्प बनले आहे .
- रोहित शर्मा आयसीसी च्या तिन्ही प्रकारातील स्पर्धांमध्ये मिळून सर्वाधिक सामने जिंकणारा दुसऱ्या क्रमांकाचा कर्णधार ठरला आहे .
- वारकरी साहित्य परिषदेचे मराठी संत साहित्य वारकरी संमेलन शिर्डी येथे होणार आहे .



- भारताच्या पंच वृंदा राठी यांची पहिल्या महिला वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडिया मध्ये नोंद झाली आहे .
- पंतप्रधान सूर्य घर योजनेत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे .
- इंदिरा गांधी इंटरनॅशनल एयरपोर्ट विमानतळाला "एअरपोर्ट सर्व्हिस क्वालिटी अवॉर्ड 2024" मिळाला आहे .



- मुख्यमंत्री समृद्ध परिवार योजना मध्य प्रदेश राज्याने जाहीर केली आहे.
- १५ वी हॉकी इंडिया सीनियर महिला राष्ट्रीय चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धा झारखंड संघाने जिंकली आहे.
- श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार २०२५ – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रदान करण्यात आला आहे.



- IIT मद्रास येथे विकसित होत असलेल्या जगातील सर्वात लांब हायपरलूप ची लांबी 410 की.मी आहे .
- छत्रपती शिवाजी महाराजांचे महराष्ट्रातील पहिले मंदीर मराडे पाडा, भिवंडी येथे उभारण्यात आले आहे .
- सुनीता विल्यम आणि बूच विल्मोर यांना Crew-10 मिशन मिशनद्वारे अवकाशातून पृथ्वीवर आणण्यात येत आले आहे.
- तेलंगणा राज्याच्या विधानसभेत ओबीसी समुदायाला विधानसभा,स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण आणि नोकरी मध्ये 42 टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर करण्यात आले आहे.
- जागतिक नेतृत्व आणि शांती साठी गोल्ड मर्करी अवॉर्ड 2025 दलाई लामा यांना देण्यात आला आहे.



- केंद्रीय क्रिडा मंत्रालयाने आयुष्मान खुराना या अभिनेत्याला फिट इंडिया आयकॉन बनवले आहे.
- जागतिक ॲथलेटिक्स संघटनेने अर्चना जाधव या भारतीय महिला ॲथलेटवर बंदी घातली आहे.
- भारत सरकारने इस्रोच्या चंद्रयान 5 मोहिमेला मंजुरी दिली असून ते जपान देशाच्या मदतीने ही मोहीम उभारली जाणार आहे.
- पुरुष व महिला महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कब्बडी स्पर्धा पुणे या ठिकाणी होत आहे.
- सार्वजनिक आरोग्य आणि जल शिखर परिषद प्रयागराज येथे आयोजित केली गेली.
- आसियान गटाची दहशतवादी विरोधातील 14 वी बैठक नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती.
- नुकतेच सुनीता विल्यम्स अंतराळातून पृथ्वीवर परतल्या आहेत त्या एकूण 286 दिवस अंतराळात होत्या.
- भारताचा दिग्गज फुटबॉलपटू सुनील छत्रीने आंतरराष्ट्रीय निवृत्ती मागे घेऊन मालदीव संघाविरुद्ध पुनरागमन केले आहे.



- राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा ग्रेटर नोएडा येथे सुरू होत आहे.
- राजीव युवा विकास योजना तेलंगणा राज्याने लाँच केली आहे.
- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षपदी क्रिस्टी कॉन्व्हेंट्री यांची निवड झाली आहे
- तेलंगणा राज्यातील Begumpet railway station पूर्णपणे महिला कर्मचारी असणारे स्टेशन ठरले आहे
- चिरंजीवी या तेलगू चित्रपट अभिनेत्याला यूके सरकार द्वारा लाईफ टाइम Achivement अवॉर्ड ने सन्मानित करण्यात आले आहे





- नामिबिया ची पहिली महिला राष्ट्रपती म्हणून Netumbo Nandi Ndaitwah यांची नियुक्ती झाली आहे
- पश्चिम बंगाल राज्यात देशातील पहिले Frozen zoo स्थापन करण्यात आले आहे
- पुण्यभूषण पुरस्कार 2025 ने कोणाला विजय केळकर यांना सन्मानित करण्यात आले

---

- भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू विराट कोहली सर्वाधिक टी २० सामना खेळणारा तिसरा भारतीय ठरला आहे
- देशातील पहिली ई वॉटर टॅक्सी मुंबई येथे धावणार आहे
- IIT गुवाहाटी ने देशाच्या सीमेवर टेहाळणी करण्यासाठी अत्याधुनिक रोबोट विकसित केले आहे
- हरियाणा राज्यातील पंचकुला येथे कॅच द रेन २०२५ अभियान सुरू होत आहे
- केंद्र सरकारने गरजू रुग्णांना रक्त मिळण्यासाठी ई रक्तकोष पोर्टल विकसित केले आहे
- महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष पदी अण्णा बनसोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे
- महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेत महात्मा ज्योतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे असा ठराव मंजूर करण्यात आला आहे
- ७२ व्या मिस वर्ल्ड सौंदर्य स्पर्धेचे आयोजन भारतात तेलंगणा राज्यात करण्यात येणार आहे
- ज्येष्ठ नागरिक आयोग स्थापन करणारे भारतातील पहिले केरळ ठरले आहे
- भारताच्या वित्त विभागाच्या सचिव पदी अजय शेठ यांची निवड झाली आहे
- १० वे अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन नागपुर येथे आयोजित करण्यात आले आहे
- आशियातील सर्वात मोठे अशी ओळख असलेले ट्यूलिप उद्यान पर्यटकांसाठी खुले होणार आहे

- महाराष्ट्र राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तपदी राहूल पांडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे



- पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे पूर्णवेळ सदस्य म्हणून संजय कुमार मिश्रायांची नियुक्ती झाली आहे
- ३.५ लाख कोटी रुपयांच्या उत्पन्नासह रोशनी नाडर सर्वात श्रीमंत भारतीय महिला बनल्या आहेत
- त्रिभुवन सहकार विद्यापीठ गुजरात राज्यात स्थापन होणार आहे
- नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर देवस्थानाला अ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा दिला गेला आहे
- खेलो इंडिया पॅरा गेम्स मध्ये महाराष्ट्र राज्याने 5 वे ( 43 पदके) स्थान पटकावले आहे
- नुकतेच म्यानमार देशात 7.7 रिश्टर तीव्रतेचा भूकंप झाला असून त्यात 1700 पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे
- हिंदूस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड कंपनीकडून १५६ लढाऊ प्रचंड हेलिकॉप्टर खरेदी करण्यास मंजुरी केंद्रीय सुरक्षा मंत्रिमंडळ समितीने दिली आहे
- मसाकी काशिवारा यांना एबेल पुरस्कार २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे
- भारतीय खेळाडू बी. सुमित रेड्डी याने निवृत्तीची घोषणा केली असून ते बॅडमिंटन या खेळाशी संबंधित आहेत.
- भारत आणि श्रीलंका या दोन देशा दरम्यान व्यापार वाढवण्यासाठी LIBA ची स्थापना करण्यात आली आहे

| देश | युद्ध सराव नाव |
|---|---|
| भारत | "हिम विजय" |
| अमेरिका | "कोल्ड रिस्पॉन्स" |
| रशिया | "वॉर गेम्स" |
| चीन | "प्लॅन 2025" |
| जपान | "फायर स्टॉर्म" |
| फ्रान्स | "ऑपरेशन मिरेकल" |
| ब्रिटन | "ऑलायड चैलेंज" |

## दिनविशेष / महत्वाचे दिवस

| दिनांक | दिनविशेष |
|---|---|
| १ मार्च | शून्य भेदभाव दिन |
| ३ मार्च | जागतिक वन्यजीव दिन |
| ४ मार्च | राष्ट्रीय सुरक्षा दिन |
| ८ मार्च | आंतरराष्ट्रीय महिला दिन |
| ११ मार्च | जागतिक मूत्रपिंड दिन |
| १४ मार्च | नद्यांसाठी आंतरराष्ट्रीय कृती दिन |
| १५ मार्च | जागतिक ग्राहक हक्क दिन |
| १६ मार्च | राष्ट्रीय लसीकरण दिन |
| १८ मार्च | आयुध कारखाने दिन |
| २० मार्च | जागतिक चिमणी दिन |
| २१ मार्च | जागतिक वनीकरण दिन |
| २३ मार्च | जागतिक हवामान दिन |
| २४ मार्च | जागतिक क्षयरोग दिन |
| २७ मार्च | जागतिक रंगभूमी दिन |

## ज्ञानपीठ पुरस्कार:

ज्ञानपीठ पुरस्कार हा भारतीय साहित्य क्षेत्रातील एक अत्यंत प्रतिष्ठित पुरस्कार आहे. याची स्थापना १९५४ साली झाली आणि तो भारतातील सर्वोच्च साहित्य पुरस्कार म्हणून ओळखला जातो. हा पुरस्कार भारतीय भाषांमध्ये लिखाण करणाऱ्या लेखकांना दिला जातो. या पुरस्कारासाठी भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे आणि लेखकाचे कार्य भारतीय साहित्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान असावे लागते.

### ज्ञानपीठ पुरस्काराची वैशिष्ट्ये:

1. पुरस्काराच्या कक्षेत लेखनाच्या विविध प्रकारांचा समावेश असतो, जसे काव्य, कथा, निबंध, नाटक, इत्यादी.
2. पुरस्कारात एक प्रमाणपत्र आणि आर्थिक पुरस्कार दिला जातो.
3. हा पुरस्कार सर्व भारतीय भाषांमध्ये दिला जातो, ज्यामध्ये हिंदी, मराठी, बंगाली, कन्नड, तमिळ, तेलगू, उर्दू इत्यादी भाषांचा समावेश आहे.



## अलीकडील ज्ञानपीठ पुरस्कार:



| वर्ष | पुरस्कृत | भाषा |
|---|---|---|
| 2021 | नीलमणि फूकन | असमिया |
| 2022 | दामोदर मौज़ो | कोंकणी |
| 2023 | रामभद्राचार्य | संस्कृत |
| 2023 | गुलजार | उर्दू |
| 2024 | विनोद कुमार शुक्ला | हिन्दी |

## महाराष्ट्र भूषण पुरस्कार:

**महाराष्ट्र भूषण पुरस्कार** हा महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे दिला जाणारा सर्वोच्च नागरिक सन्मान आहे. या पुरस्काराची स्थापना १९९५ साली झाली होती, आणि त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातल्या विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जातो. या पुरस्कारात एक प्रशस्तिपत्र, शाल, आणि आर्थिक ( २५ लाख ) पारितोषिक दिले जाते.

### पुरस्काराचे प्रमुख क्षेत्रे:




- कला आणि साहित्य
- विज्ञान आणि तंत्रज्ञान
- सामाजिक कार्य
- सांस्कृतिक क्षेत्र
- खेळ


### पुरस्कार प्राप्त व्यक्तींची यादी

| वर्ष | नाव | क्षेत्र |
|---|---|---|
| १९९६ | पु. ल. देशपांडे | साहित्य |
| १९९७ | लता मंगेशकर | कला, संगीत |
| १९९९ | विजय भटकर | विज्ञान |
| २००० | सुनील गावसकर | क्रीडा |

| | | |
|---|---|---|
| २००१ | सचिन तेंडुलकर | क्रीडा |
| २००२ | भीमसेन जोशी | कला, संगीत |
| २००३ | अभय बंग आणि राणी बंग | समाजसेवा व आरोग्यसेवा |
| २००४ | बाबा आमटे | समाज सेवा |
| २००५ | रघुनाथ माशेलकर | विज्ञान |
| २००६ | रतन टाटा | उद्योग |
| २००७ | रा.कृ. पाटील | समाजसेवा |
| २००८ | नानासाहेब धर्माधिकारी | समाजसेवा |
| २००८ | मंगेश पाडगावकर | साहित्य |
| २००९ | सुलोचना लाटकर | कला, सिनेमा |
| २०१० | जयंत नारळीकर | विज्ञान |
| २०११ | अनिल काकोडकर | विज्ञान |
| २०१५ | बाबासाहेब पुरंदरे | साहित्य |
| २०२१ | आशा भोसले | कला, संगीत |
| २०२२ | अप्पासाहेब धर्माधिकारी | समाजसेवा |
| २०२३ | अशोक सराफ | कला, सिनेमा |
| २०२४ | राम सुतार ( शिल्पकार ) | कला |





स्पर्धा परिक्षा

sureshmaza@kotak

Scan & pay >

Suresh narayan kumbhar

यात तुम्हाला मिळणार... !!

1. कोणत्याही एका विषयाची नोट्स किंमत = ४९ रुपये /-
2. कोणताही दोन विषयाच्या नोट्स = ८९ रुपये /-
3. सर्व नोट्स एकत्र घेतल्यास = १९९ रुपये /-

**मोफत [ चालू घडामोडी मासीक चालू महिना + मागील सर्व महीने ]**

**( पैसे पाठवल्या नंतर +917720039454 या नंबर वर स्क्रीनशॉट पाठवा )**

www.mpscshort.in

( Teligram चेनल जॉइन करा आणि मिळवा सर्व स्पर्धा परीक्षा अपडेट मोफत @mpscshorts )

© All right reserved @mpscshorts – 2024 ( education perpose only don’t violate coppyright Act )

**#Udyam registation number - MH-25-0036092**

Contact@mpscshort.in / +917720039454

